# प्रकरण चौथे

## 'डवरणी' कथासंग्रहाच्या संदर्भात समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण

## प्रकरण चौथे

### 'ढवरणी' कथासंग्रहाच्या संदर्भात समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण

आनंद यादव यांचा 'ढवरणी' हा सोळा कथांचा संग्रह ऑगस्ट १९८२ मध्ये प्रकाशित झाला. सदर कथांचे लेखन १९६५ ते १९७५ या दहा वर्षाच्या कालावधीत झाले आहे. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात बदल होत जात असलेल्या कालावधीतच या कथांची निर्मिती झाली आहे. 'या बदलणा-या ग्रामजीवनाचे चित्रण कथांतून करणे आपल्याला अभिप्रेत होते.' असे स्वत: आनंद यादव सांगतात. ते म्हणतात, "बदलत्या ग्रामजीवनाची चाहूल काही प्रमाणामध्ये 'इंजिन', (खळाळ) मध्ये लागली आणि 'ढवरणी' मध्ये बदललेल्या खेड्यांचे चित्रण केले आहे. शेतीप्रधान ग्रामीण भागातील होत असलेले हे बदल साहित्यात यायला हवेत. आणि तशा भूमिकेतूनच 'ढवरणी'ची निर्मिती झाली आहे."[१]

आनंद यादवांच्या 'ढवरणी' या कथासंग्रहातील कथांमध्ये शेती या व्यवसायाचे आणि शेतकरी, शेतमजूर यांचे चित्रण 'खळाळ' मधील कथा पेक्षाही कमी प्रमाणात येते. तसेच ग्रामीण जीवनाला व्यापून टाकणा-या दारिद्र्याचे, धर्मश्रद्धा, अंधश्रद्धा इ.चे चित्रण अल्पप्रमाणातच येते ते त्यांच्या कथांचे विषय बनत नाहीत. त्यांच्या कथांतून कौटुंबिक जीवनातील ठराविक नातीचं चित्रित होतात. उदा. त्यांच्या कथातील स्त्री पत्नी, प्रेयसी, आई एवढयाच नात्याने भेटते व पुरुष नवरा, प्रियकर, बाप एवढयाच नात्याने प्रकट होतो. स्त्री-पुरुषांच्या नात्यामधील विविधता येथे प्रकट होत नाही. वर नमूद केलेले विषय हे त्यांच्या कथांत आनुषंगिक स्वरूपात

उल्लेखातून निर्दिष्ट होतात. ते त्यांच्या कथांचे विषय बनत नाहीत.

तेव्हा कोणते विषय यादवांच्या कथेचे विषय होतात व आपल्या कथा चित्ताकर्षक करण्यासाठी ते संघर्षाचे व त्यातून निर्माण होणा-या ताणाचे कसे चित्रण करतात, हे पाहू.

शेती, शेतकरी, शेतमजूर यांचे चित्रण -

ग्रामीण भागामध्ये शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे आणि त्याला अनुसरूनच बाकीचे सारे व्यवसाय चालू असतात. सधन शेतकरी रोजगारी वगैरे संबंध निर्माण होतात. गाडी-बैल सांभाळून भाड करणारा एखादा भाडेकरू शेतकरी सुध्दा असू शकतो. शेतीचे साकल्यात्मक दर्शन कितपत घडते ते पाहू.

कण्हेरीच्या वाडीच्या म्हातारीचा तीस-पस्तीस वर्षाचा मुलगा गाडीभाडं करूनच जगतो आहे.(हूल) धोंडबा दारिद्र्याशी झुंजत भाडेकरूचे जीवन जगतो आहे. (स्वताची गाडी) जयवन्ता चाळीस एकराचा मालक आहे. सधन शेतकरी आहे. (चित्तूर आणि चोळी) संतू गबर शेतकरी आहे आणि दत्तू हा तिथला रोजगारी आहे. (कोंडमारा) धोंडबाची जमीन सहजतेनं घशात घालणारा शेजारी पवार तसा मातलेला शेतकरी आहे. दारात ट्याक्टर आहे. सुगरमिलला घरचा ट्रॅक्टरनं ऊस वडतो. शेतक-यांना चिंबवून चांगलाच गबर झाला आहे. (खताची गाडी) कमालीचा बेरकी चव्हाणाचा किसना स्वत:च्या गुन्हाळात खुळ्या शंकर पसारेकडून फुकटात कामं करवून घेतो. (शहाणा गाव)

पांढ-या शुभ्र सद-याखाली, सधनेतच्या बुडाखाली काळेपणा लपलेला असतो. हे इथल्या ब-याच कथांतून दिसते. जनसेवेच्या नावाखाली भ्रष्टाचारी जीवन जगण्याचा अधिकारच जणू अशा सधन शेतक-यांना दिलेला असतो.

यादवांच्या कथेतील पात्रांचा शेतीशी संबंध असल्याचे काही निर्देश येतात. मात्र या व्यवसायाशी खास निगडित असणारे विषय त्यांच्या कथांचे विषय होताना दिसत नाहीत. सधन शेतक-याचे समाज सापेक्ष समष्टीप्रधान चित्रण येत नाही त्याच्या मनाचे चित्रण येते. सधन शेतक-याची आणि रोजगा-यापैकी एखाद्या स्त्रीची किंवा पुरुषाची भेट घडविण्याचे ठिकाण शेतमळा आहे इतकेच शेताला महत्त्व आले आहे. एकंदर जीवनाचा पाया म्हणण्याइतपत त्याला महत्त्व दिलेले नाही. शेताची अशी अपरिहार्यता जाणवत नाही. शेतकरी व रोजगारीण म्हणून संतूने जशी धोंडीला 'गाठली' तीच कथा तंबाखूच्या कोठ्यात किंवा शेंगतेलाच्या गिरणीतही घडणे शक्य आहे. म्हणजे शेताची शेतक-याची तशी अपरिहार्यता जाणवत नाही.

दारिद्र्याचे चित्रण -

ग्रामीण जीवनाला व्यापून टाकणा-या दारिद्र्याचे यादवांच्या 'डवरणी' मधील कथात कोणत्या प्रकारचे चित्रण येते, ते पाहू.

आयुष्यामध्ये सर्वच माणसं सुखी असतात असे नाही. प्रापंचिक गरजा भागविता भागविता नाकी नऊ येते. शेतीचे उत्पन्न मुळातच बेभरवशाचे, त्यात गरजांची अशी अधिकता म्हणून काही वेळा जीवनाचाच तिटकारा येतो. मनाला, अंत:करणाला पिळवटून टाकणारी गरिबी माणसालाच भावनिक पातळीवर गिळू पाहते. इतकी जिव्हारी झोंबणारी गरिबी जरी नसली तरी त्याच्या जवळपास जाऊन चित्रण करणारी गरिबी 'डवरणी' मध्ये आहे का पाहणे गरजेचे वाटते. ग्रामीण समाज जीवनाचा तो एक अविभाज्य भाग आहे. अपरिहार्यतेने त्याचे चित्रण येणे गरजेचे असते.

'खताची गाडी' चालविणारा धोंडबा आणि म्हातारीचा मुलगा (हूल) ही माणसं दारिद्र्यात दिवस कंठताहेत अशी माहिती दिली आहे. माहितीमध्ये खोलवरचे दृष्य दर्शविणारे चित्रण येत नाही. बाबजीला (हल्लक) दारू प्यायची सवय आहे. म्हणून तेथे गरिबी आहे. मुलं भुकेपोटी खेकडे भाजून खातात. पण बाबजीचे दारू पिणे हे अपरिहार्यतेने येते असे घडत नाही.

चोरीच्या बाबतीत बोलावयाचे म्हटल्यास दत्तूची आई रुक्का आणि पत्नी धोंडी फार फार तर संतूच्या मळ्यातून भाजी, जळण यापेक्षा इतर मोठ्या वस्तूची चोरी करत नाहीत. (कोंडमारा) मल्लू रामोशाची बायको सहजतेने एखादी चोरी पचविते. कपडे, चपलांची चोरी करते. तर खुद्द मल्लू दोन-चार बकरी सहज चोरून आणायचा. त्याची मुलं मध्या आणि कंत्या अट्टल चोर बनले आहेत.

'डवरणी'मध्ये दारिद्र्याची विदारकता जाणवत नाही. कोणताही माणदेशी माणूस दारिद्र्यासह जसा साकार होतो तसे दारिद्र्य डवरणीत नाही. या इथल्या पात्रांची मूलगामी प्रवृत्तीच भिन्न आहे. चोरी बाबतीत 'दत्तू भाडेकरू' चोरी केल्याशिवाय जगूच शकत नाही. 'बापू मांग' चोरीचे प्रमाणपत्र मिळविलेला आहे. तेथे चोरीला सबळ कारण आहेत. "पोटाला काम न्हवतं गा." हे त्याच उत्तर आहे तशी अटळ भूमिका येथे नाही. लेखनात तशी उदाहरणे ठिगळ लावल्याप्रमाणे वाटतात.

धर्मश्रध्दा, अंधश्रध्दा, संकेत इत्यादींचे चित्रण -
---------------------------------

हिरा जोगतीणीच्या अंगात यल्लमाचा 'संचार' व्हायचा. ती शुक्रवारी देव सांगायची तिच्या सांगण्यावरूनच बनव्वानं यल्लमाचा एक टाक देव्हाऱ्यात बसविला. लग्नानंतर नऊ वर्षांनी 'दिवस गेले.' यामध्ये यल्लबाईची कृपा झाली आणि आपणाला आईपण प्राप्त झालं अशी तिची

श्रध्दा आहे· देवऋषी दत्तू पठाऱ्यावरही वनव्वाचा भविष्याच्या दृष्टीने भरवसा आहे· (पृ· ११३) मूळ कथेला पोषक असे वातावरण निर्माण करण्यामध्ये या घटनेचा खूप फायदा झाला आहे·

मेकेकऱ्याची 'दारका 'वारल्यानंतर प्रेताला आंघोळ घातली आणि ओटी भरून तिरडीवर निजविण्यात आलं· (पृ·१०) सौभाग्यवती स्त्रीच्या निधनानंतर ओटी भरण्याची पध्दती आहे·

हृदयक्रिया बंद पडून ती वारली पण समजूत अशी झालेली आहे· कोणीतरी वाईटावर असंल कुणीतरी मूठ मारली असल· (पृ·१०) अशी संभाव्य शक्यतेची श्रध्दाळूवृत्ती साकार होते·

भाद्रपद हा म्हाळाचा महिना पितरांना नैवेद्य देण्याची धार्मिक पध्दती आहे· स्वर्गस्थ आत्म्याला शांती लाभते असा समज आहे· सोना आजाच्या भडग्याकडं निवद घेऊन जात होती· (पृ·२७) शेताकरच्या वाटेवर जयवन्ता आणि सोना यांची भेट घडविण्यासाठी या घटनेची योजना केली आहे· मारलेल्या सापाच्या तोंडात पैसा घालून जाळण्याची पध्दती आहे· (पृ·१०४) या घटनेच्या उल्लेखाने कथेला एका चांगल्या वातावरणाचा लाभ झाला आहे·

सायकल चालवायला शिकताना राणूच्या पायाच्या अंगठ्याला दुखापत झाली· नंतर सुजलेल्या अंगठ्यावर भिवरानं भंडारा घालून अंगठा बरा करण्याचा प्रयत्न केला· (पृ· १३६) नवऱ्याला झालेली दुखापत बरी व्हावी म्हणून भिवरा बिरुबाला नवस बोलण्याच्या विचारात आहे· यल्लूबाईचा अंगारा लावण्याचा मनोदय व्यक्त करते· (पृ·१३८)

भंडारा, अंगारा, बुक्का यांच्या वापराने आजार बरा होतो· देवाला भेटण्याविषयी, त्याला प्रसन्न करण्याविषयी हा अंगारा-धुपाचा वापर करण्यात एक श्रध्दा आढळते·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वारांना महत्त्व -

साधगारडी इराप्पा हातचलाखीने जादूचे खेळ करतो. ताईत विकण्याचा व्यवसाय करतो. ग्रामसेवक सुबरावाला भोलेनाथाचा वार म्हणून सोमवार करण्याचा सल्ला देतो. (पृ.१०२)

हिरा जोगतिण वनव्वाला यल्लूबाईच्या नावानं भंडारा लावते. 'यल्लूबाईच्या कृपेनं तुला आईपण आलं. वार सोडू नगं' (पृ. ११३) तेव्हा पासून वनव्वानं 'शुक्रवार' व्रताप्रमाणे आचरलं आहे. येथे तसे महत्त्व आहे पण उलट वैशाखाच्या तिसऱ्या 'बुधवारी' प्रेयसी सोनाचं लग्न झालं म्हणून (शिकार की सूड १) जयवन्ता प्रत्येक 'बुधवारी' चित्तूर मारत हिंडतो. (पृ. २३)

उग्र कवठी वाफ्याप्रमाणे उमलत जाणारी कोंडी दिनकरच्या 'रविवारच्या' सुटीची वाट पाहत थांबते. (पृ. ३७)

व्रताने सुखावणारी पात्रे आहेत. आयुष्यामध्ये माणसं सुख-समाधानासाठी देव-धर्म, पूजा-अर्चा, शांतिक पूजा, व्रताचरण करीत असतात. अनेकविध स्वरूपाच्या श्रध्देवर विश्वास ठेवतात. खूप संकेत पाळतात. ग्रामीण समाजाचा तो एक अविभाज्य भाग आहे. संकेतांचे केवळ उल्लेख आलेले आहेत. मांडण्यामध्ये सखोलता यावी म्हणून असे सारे संदर्भ आहेत. कथेचा मूलगामी विषय होण्याइतपत हे संकेत प्रबळ नाहीत. श्रध्दांना अतिशय महत्त्व आहे. असे चित्रण 'ओढ' कथेशिवाय इतरत्र आढळत नाही. या संदर्भात इतर काही संबंधित कथाकाराकडे वळले असता ग्रामीण जीवनातील अतिशय सूक्ष्म संकेत, श्रध्दा यांची माहिती शंकर पाटील आणि व्यंकटेश माडगूळकर यांना आहे. तशी चित्रणे त्यांच्या कथांमधून पहावयास मिळतात.

"बैलाची शिंगं गोल असून त्यांची टोकं एकमेकाला मिळालेली असणं अशा मिळालेल्या शिंगातून व्हला गेला म्हणजे तो बैल आज ना उद्या मरणार."

अशी पारंपारिक श्रध्दा आहे. संपूर्ण 'व्हला' ही कथा या श्रध्देच्या संबंधातच विवेचन करीत राहते.[२]

तांबड्या भुजंगाच्या दर्शनाने पंधरा वीस दिवसातच माणसाला मृत्यू येतो. अशी श्रध्दा शिवाची (सग्र) आहे. रानातल्या त्या भुजंगाच्या अवचित दर्शनाने मृत्यू येतो असे दोन-तीन पिढया चाललेले होतें. म्हणूनही शिवा अंतरंगातून हादरला होता.[३]

कोणीतरी करणी केली म्हणूनच आपल्या कोंडीचे केस कापले गेले. माचोलीवरली धान्याची पोती पेटली. कपडे जळले असे विविध प्रसंग चित्रित केले आहेत.[४] सामान्य जनश्रध्देचा आधार घेऊनच कथी पुढे सरकत राहते. 'करणी' हाच कथेचा मुख्य विषय आहे. बंडा आणि बापू न्हावी, कोंडी तिची आजी या संबंध न्हावी कुटूंबाचे गावासह 'करणीच्या' श्रध्देतून निर्माण झालेल्या समस्याचे चित्रण आले आहे.

श्रध्दा, संकेत, धर्मविचार हा कथेचा विषय होण्याइतपत महत्त्व त्यांना 'ङ्वरणी' मध्ये दिसत नाही. 'संशयात्मा' मधील ज्ञानदेव दर्शनी श्रध्दाळू वाटतो पण एकंदर संशयी वृत्तीचा अतीव परिणाम झाल्याने त्याला विकृतीचे स्वरूप आले आहे. मनाचा अती सूक्ष्म विचार आला आहे. प्रकृतीचे विश्लेषण प्रकृती, स्वाभाविकता म्हणून यायला हवे. तशी सहजता येत नाही. विकृती आणि कृत्रिमता यांचा पदोपदी प्रत्यय येतो. ङ्वरणीच्या मलपृष्ठावरील 'स्पंदनशील मनाची प्रतिमायुक्त चिंतनाने कथा ङ्वरणी आहे.'- असे म्हटलेले विधान खरे आहे. मात्र ग्रामीण जीवन हे प्रतिमायुक्त चिंतनातून साकार होत असते, असे म्हणवत नाही. 'नांगरट' ही शंकर पाटील यांची कथा शेताशिवाय इतरत्र घडणेच शक्य नाही. शेत कथेच्या केंद्रवर्ती आहे. त्याभोवतीच सारी कथा गुंफलेली आहे.[५] शेताची तेथे अपरिहार्यता जाणवते. तशी येथे अपरिहार्यता जाणवत नाही.

नाही म्हणायला 'खताची गाडी' ही एकमेव कथा शेतीविषयीची अपरिहार्यता जाणवणारी वाटते. ब-याच अर्थाने पूर्णतेला जाऊ पाहणारी ही कथा तसा शेतीचा संदर्भ देऊन जाणारी आहे. शेती-रान मात्र संपूर्ण कथेच्या संपूर्ण केंद्राचे स्थान पकडू शकले नाही. ही गोष्ट मात्र निर्विवाद खरी आहे.

<u>कौटुंबिक जीवनाचे चित्रण -</u>

आयुष्यभर एकमेकाला साथ देणारी आणि एकमेकांच्या सुख-दुःखात ही सहभागी असलेली पति-पत्नी यांची अनेक उदाहरणे येथे आहेत. मल्लूच्या चोरीच्याच कामाला हातभार लावणारी तारा खरोखरच सहधर्मचारिणी वाटते. एकोणीस पोरांच्या बग्यातूनही ती नव-याची साथ करते आहे. कृयाप्पा कोरवी आणि पत्नी वनव्वा ही जोडी व्यवस्थित संसार करते आहे. लग्नानंतर नऊ वर्षांनी दिवस गेले.आता त्या तम्माचे वय बारा - तेरा वर्षांचे आहे. पती-पत्नी व एक मुलगा असे सुखी कुटुंबाचे चित्र दिसते. (ओढ)

'खताच्या गाडीचं भाडं' करणारा 'धोंडबा', पाच मुलं आणि पत्नी असा समाधानी संसार करतो आहे. दारिद्याची पार्श्वभूमी आहे खरी पण पती-पत्नी एकमेकांशी भांडल्याचे चित्रण येत नाही. रामवराव मते आणि गोदाताई (सुटकेतला पाश) यांचा संसार सुखाचा आहे. आपले पतिराज देशसेवा - समाजसेवा असे काहीसे करतात.या गोड गैरसमजातच ती अखेरपर्यन्त वावरते. सापगारडी इराप्पा आणि त्याची पत्नी गंगव्वा ही जोडी न भांडणारी आहे. गंगव्वा ही स्त्री बोलत नाही. पण तिची वागणुकीची त-हा ध्यानात येते. माळावरच्या पालात एकटीच पडून आहे. तिची उस्तवारी-सेवा करण्यामध्येच त्याचा बराच कालावधी जातो.

'संशयात्मा' मधील ज्ञानदेव आणि मुलगी गौरी अशी दोघेच काळो-खोल घरात राहतात. परशराम आणि सोना (ठिणगी) राणू आणि भिवरा (राणूची बायको), आत्माराम आणि मंजा, शिवराम आणि राधी (क्वठी चाफा) पैकी राधी वगळता सोना, भिवरा, मंजा या स्त्रियांनी किती जमतील तितक्या शिव्या दिल्या आहेत. स्त्री-जीवनाची मर्यादा त्यानी सोडली आणि परशराम, राणू व आत्माराम ही स्वत्व संपवलेली पुरुष मंडळी कुटुंबाकडे ध्यान द्यायला तयार नाहीत किंवा सवड नाही अशी विचित्र अवस्था त्या कुटुंबांची आहे. शालीन व कुलीन स्त्री-चा अंशावत मात्रही येथे दिसत नाही.

सोना (चित्तूर आणि चोळी), कोंडी, मंजा (क्वठीचाफा) या स्त्रियांमधील प्रिय सखीचेच रूप ध्यानात राहते. सोना व मंजा या स्त्रि-या गृहिणी म्हणून ध्यानात रहात नाहीत. मंगला आणि गिरजाबाई दाजी मोहिते (मोहितेबाई) या स्त्रिया पुरुष वासनेचा शिकार बनल्या आहेत. मंगला आणि गिरजाबाई या अर्थार्जन करणा-या स्त्रिया आहेत. मंगला ही आदिवासी मुलगी, मॅट्रीक-नंतर दोन वर्षाचा मिड्वाईफचा कोर्स पूर्ण करून कोंडगाव येथे संततिनियोजन केंद्र चालवित होती. 'गाव गिधाडांच्या' काम वासनेचा ती शिकार बनली. गिरजाबाई शिक्षिका म्हणून नोकरीला लागतात आणि संस्थाध्यक्ष रामराव मतेंच्या विळख्यात गेल्या. वासनापूर्तीनंतर ती घटना तिला जास्त खटकली. कुटुंबजीवन हरवलेली मोहितेबाई दुस-याशी समरस होत असताना त्यातून गैरमार्ग असा निर्माण झाला. कोंडमा-यात पारी, लक्षी, हौशी या उफाडमातल्या बायका संतूशी अनैतिक-वासनिक संबंध साधून आहेत.

'ढवरणी' मधील स्त्रिया पत्नी, प्रेयसी, आई केवळ एवढयाच नात्यांनी भेटतात. शंकर पाटील यांच्या कथेतील बहुविध रूपे म्हणजे सासुर-वाशीण, नणंद, भावजय, नणंद, बहीण, स्त्रीचे माहेर; सासर यांचा संबंध आला नाही. निदान उल्लेख तरी यायला हवा होता. तसा सहजोल्लेख-

सुध्दा येथे नाही· स्त्री-पुरूष संबंधाचे भडक वर्णन येत राहते· स्त्री-पुरूष यांचे अनेकविध स्वरूपातून नातेसंबंध असतात ही गोष्ट येथे चित्रित होत नाही·

व्यक्तिमनाचे चित्रण -

गिधाडं, कवठी चाफा, सुटकेतील पाश, कोंडमारा, संशयात्मा, ओढ, राणूची बायको, हूल, ठिणगी, यांसारख्या कथांमध्ये पात्रांच्या मानसिक ताणाचे चित्रण सुस्पष्टपणे जाणवते· यातील बहुतेक कथा विलोभ पध्दतीने सांगितल्या आहेत·

गिधाडांच्या- गावगुंडाच्या वासनेचा शिकार बनलेली 'मंगला' मुळासह उन्मळून पडलेल्या झाडाखारखी सामोरी येते· उदरनिर्वाहासाठी कांडगावला नोकरी करणाऱ्या मंगलाची तालुक्याहून परत येताना बेअब्रू केली जाते· बलात्कारानं खचलेल्या मंगलाची प्रत्यक्ष गावातील स्त्रियांकडून वारंवार जेव्हा अतिचौकशी केली जाते तेव्हा तर अब्रूच्या चिंधड्या वेशीवर टांगल्या जातात· अब्रूच्या धांतोटया निघालेली मंगला भेदरलेल्या हरिणी-सारखी वाटते· जिच्या अब्रूसंबंधाने चर्चा वर्तमानपत्रातून आली तिच्याशी कोण लग्न करणार ? स्त्रीची अब्रू काचेच्या भांड्यासारखी, पिचत नाही तोपर्यन्त ··· पण सारी बेअब्रू झाली· ताण अतीव झाल्याने शेवटी झोपेच्या खूप गोळ्या एकदम घेऊन ती आत्महत्या करते·

स्वत:च्या आईचा परपुरूषाशी होणारा उत्तान शृंगार पाहून 'कवठी चाफा' मधील बहकते व कुमारी अवस्थेत गरोदर राहते· कवठी चाफ्याप्रमाणे उमलणारा, उग्र चाफ्याप्रमाणे घमघमणारी कोंडी आईच्या मंजाच्या - शिव्या खाऊन बोथट बनली आहे· सात महिन्याची गरोदर आहे· या घटनेने आपापल्यापरीने विशिष्ट ताणाखाली वावरत आहे· उपवर मुलीच्या विवाहाच्या प्रश्नाखाली मंजा दबलेली आहे· पत्नी मंजा आपणाला आवरत नाही, आपलं ऐकत नाही म्हणून अती ताणानंतर

खचलेला लाचार झालेला आत्माराम हॉटेलात कप-बशा विसळतो आहे. कोंडीच्या पोटचं पाडण्याची घटना तालुक्यात सर्वांना समजली तर वर्तमानपत्रातून आपल्या नावाची जाहीर विटंबना होईल या भीतीने न्हावी सरपंच शिवराम दबकून आहे. दिनकर-कोंडी यांच्या संबंधाबद्दलचा आळ येण्याची शक्यता विचारात घेऊनच दिनकरनं लग्न केलं आहे. शेवटी ताण वाढून वेगळा मार्ग शोधला जातो तो उताण्या झोपलेल्या कोंडीच्या पोटावर लाथा घालून गर्भ निचरा करण्याचा. आत्माराम, मंजा, कोंडी, दिनकर, शिवराम, त्याची सुजरी बायको राधी सारीच एकंदर अनैतिक संबंधाने निर्माण झालेल्या ताणाखालीच वावरत आहेत.

विधवा मोहितेबाईच्या अनैतिक वर्तनाचे चित्रण लेखकाने फारच सोपेपणाने केले आहे. मोहितेबाईना 'दिवस गेले आहेत.' सामाजिक कार्यकर्ते, लोकजीवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामराव यांनीच अतिप्रसंग केलेला - त्यातून ही फलनिष्पत्ती झालेली होती. विधवा असूनही आपण मुलाला कसा जन्म द्यावयाचा ? हा प्रश्न मोहितेबाईना सतत सतावत आहे. एके रात्री क्षणिक शरीर सुख घेतलं त्यातूनच हा पाश निर्माण झाला. सुटकेसाठी कागलला मतेच्या घरी येतात. यथावकाश मुलगा जन्माला येतो. सामाजिक प्रतिष्ठेसाठी रामराव मत्यांनी त्या बाळाची सोलापूर येथे हत्या केली. मोहितेबाई नऊ महिने ताणाखाली वावरतात तर मोहितेबाई घरी आल्यापासून मतेसाहेब अंतर्यामातून बावरले आहेत पण ते तसे दाखवत नाहीत एवढाच फरक आहे. कुळ, घराणं, प्रतिष्ठा यांच्या दबावाखाली मोहितेबाई आणि रामराव मते वावरत असल्याचा प्रत्यय येत राहतो.

संशयी जानदेवाचे विकृत स्वरूपाचे चित्रण केले आहे तो नेहमीच एका ताणाखाली वावरतो आहे. मोठ्या भावानं आपणावर काहीतरी करणी केली. हळद कुंकू भरलेली लिंबं पडली की मुलगी आजारी पडायची आणि सात-आठ दिवसात मुलगी मरायची. सात मुलींपैकी एक 'गौरी' नावाची

जगलेली होती· त्यामुळे लिंबू आणि मरण यांचा संबंध त्याला सतत भेडसावत रहायचा· गवळी, डाक्टर, दुकानदार वगैरे सर्वांविषयी कमालीचा संशय आहे· या संशयीवृत्तीमुळे जगणं-मरणं या विशिष्ट ताणाखाली वावरत आहे कोणावरही कसलाही विश्वास नसलेला हा ज्ञानदेव स्वत:च्या अस्तित्वाविषयी सुद्धा साशंक आहे· आपण फार तर एक दोन वर्षेच जगणार आहोत· अशी त्याची बालंबाल खात्री आहे·

हूल मधील शेडगावचा पाटील आणि 'कोंडमारा' मधील दत्तू या दोन पात्रांचा अल्पशा प्रमाणात ताणासंबंधीचा निचरा होतो· कन्हेरीच्या वाडीची म्हातारी बाजारच्या लोकांनी मारली पण त्या घटनेची सारी जबाबदारी गावपाटलावर येते· अंतरंगातून पूर्णपणे पाटील भ्यालेला असतो· पण शेवटी म्हातारीला मुलाचा कसल्याशा कागदावर अंगठा घेऊन संघर्ष संपविला जातो· मानसिक ताणावातून पाटलाची सुटका होते·

धनवंत शेतकरी संतूमुळेच दत्तूची गुजरान चालू असते· आई अक्का पत्नी धोंडी व तो स्वत: असे तिघेही रोजंदारीने कामाला असतात· संतूची अनैतिक चाल पाहून आपली नैतिकता टिकून राहिली पाहिजे म्हणून संतूच्या शेतात आईचे व बायकोचे कामाला जाण्याचे बंद करवितो· दत्तूच्या एकट्याच्या रोजगारावर घरखर्च भागेना· तो आर्थिक कोंडीने, अत्यंत संतापलेला असतो· आर्थिक कोंडीने व संतूचा आईशी अनैतिक संबंध आहे की काय या संशयाने मनावरचा ताण असह्य होऊन दत्तू शेवटी संतूवर दगड घालतो· संतू रक्तात नाहलासारखा दिसू लागतो·

या कथेतील सनसनाटी प्रसंग लेखकाने कृत्रिमपणे निर्माण केले असल्याचे जाणवते· 'भिवरा'-राणूची बायको आपलं मन मारून या खुळ्या तपण्याजवळ प्रपंच करीत होती· त्याचा पेहराव, त्याचं ते गबाळं वागणं· अस्वच्छता पाहून ती वैतागली होती· गेल्या सहा वर्षात चार मुलं झाली· तरीही या व्यवहारशून्य देवभोळ्या माणसाबरोबर ती प्रपंच करीत होती· राणूने

पाय तोडून घेतल्यानंतर मात्र तिला तेथे राहवेना. "घराला दाल्ला धड तर संसार धड' या धारणेने ती शेवटी राणूला सोडून जाते. राणूला मोठी समस्या पडते, "आता पत्नीशिवाय आपलं कसं होणार ? शिवराला वाटत राहते की सहा वर्षे संसार करूनही शेवटी सारं मातीमोलच" (पृ. १३९) स्वत्व हरविलेली ही दोन्ही पात्रे अंतरंगातून सारखीच झुरत असतात. सारेच सांभाळूनही शेवटी निष्फळ झाल्याने संपूर्ण पात्रांना एक प्रकारची पोकळी निर्माण होते.

कृयाप्पा कोरव्याचा एकुलता एक मुलगा- तम्मा- त्याला नदीची- साती आसरांची- ओढ लागते. संसाराला लागल्यापासून नऊ वर्षानंतर तम्माचा जन्म झाला. बारा वर्षांच्या तम्माने सनईतून सा-या सूर लिख्या आत्मसात केल्या होता. पण शिवापूरचे लग्न आटोपून पानगावला परत येताना कृष्णामाईने तम्माला चिरविश्रांती दिली. कृयाप्पा आणि वनव्वा यांनी जिवापाड जपलेला पुत्र नदीने खाल्ला. (पृ. ११८) शोकांत जीवनाची ही परिसीमाच आहे.

मानसिक तणाव निर्माण केल्याने कथेची आकर्षकता वाढते या हेतूनेच या कथांतील तणाव कृत्रिमपणे निर्माण केल्याचे जाणवते. ; संघर्ष जितका जास्त तितकी कथा चांगली अशी धारणा झाली आहे. परिस्थिती तणावापेक्षा कल्पनानिर्मित मानसिक तणाव निर्माण करण्याकडेच ; यादवांचा जास्त कल दिसतो. शंकर पाटील यांच्या कथेतील "नाटकाचा" दिग्दर्शक अन्याबा परीट[६] (नाटक) चुकलेल्या मुलाला कळोलीच्या वाडीला घेऊन येणारा "पाहुणा"[७] (आफत) रात्रीच्या वेळी प्रेयसीची वाट पाहणारे शिवराम आणि तुकाराम[८] (प्रतीक्षा) या पात्रांच्या मनातील तणाव जसे स्वाभाविक परिस्थितिजन्य वाटतात, तसे यादवांच्या कथांतील तणाव वाटत नाहीत.

## कथांमधील मनोविश्लेषण -

'डवरणी' मधील बहुतेक कथांमध्ये लेखक मनोविश्लेषण करू इच्छितो· कामुकतेचे चित्रण लेखकाने मोठ्या प्रमाणात केलेले वर नमूद केलेल्या कथावस्तू- ही जाणवते· हे चित्रण अनेकदा विकृतीच्या पातळीवर जात आहे, की काय असेही वाटते· 'माझी पारिली वासरो' या कथेतील निवेदकाचे वय चार-साडेचार वर्षाचे आहे· तेव्हा अशी शंका येते की, कथानायकाच्या बालवयात एवढाले विचार येत असतील काय ? या कथेच्या संदर्भात फ्रॉईडच्या काम प्रेरणेसंबंधीच्या विचार- सरणीचा प्रभाव आहे असे म्हणावेसे वाटते· दांडग्या बायकू संबंधी आणि तानीबाईच्या अंगावरचं दूध पिताना येणारा प्रचंड जीवनव्यापी अनुभव सांगितला आहे· प्रेमात पराभूत झालेला जमकन्ना विमनस्क मनाने, उपरती आल्याप्रमाणे वावरतो· प्रेमातले अनेक ताणावाचे, ओढीचे पैलू दर्शविले आहेत· कोंडलेला दत्तू म्हणजे आड आणि विहीर यात सापडलेला रोजगारी मन कोंडलेले आहे· त्यातूनच विकृतता निर्माण होते आणि घर फिरायला लागतं· त्यातूनच त्याचं मढं जाऊ लागतं·(पृ· २०)

गिरजाबाई दाजी मोहिते (सुटकेतील पाश) मंगला, ( गिधाडं) तम्मा, (ओढ) या तीनही व्यक्तिरेखा म्हणजे होय-नाही या परिघावर वावरताना आढळतात· गिरजाबाई आणि मंगला सुखाने नोकरी करण्याचा मनोदय करतात· तम्मा सनईच्या सुराशी खेळताना बाप कुमाप्पा कृतकृत्य झाला· नदीतल्या भोवऱ्यात सापडलेली वस्तू गतीसहच खोल-खोल पाण्या- मध्ये जाते· प्रस्तुत कथालेखकाने कथानकासोबतच पात्रांच्या अंतरंगातील खोल भाव टिपलेले आहेत· या पात्रांचा असा काही विकास केला आहे की शेवटी पात्रे हतबल होऊन किंवा ज्या घटनेची भिती वाटत होती त्यातच शेवटी मृत्यूमुखी पडली आहेत· मंगला जगण्यासाठी नोकरी करते आणि नोकरीत असतानाच झोपेच्या गोळ्या घेऊन तिने चिरविश्रांती घेतली·(पृ·६२) तम्माला ज्याची 'ओढ' होती त्यातच-कृष्णामाईतच-त्याचा अंत झाला·(पृ११८)

"मडकं कुंभाराचं नव्हे, मडकं मातीचंच रे बाळा" म्हणणा-या गिरजाबाई बाळाचाच मृत्यू पाहतात (पृ.१५४) उपरोक्त तीनही पात्रांची सुटका मरणानेच झाली आहे. मरण म्हणजे जगण्यालाच पूर्णविराम दिला असे सुचवायचे आहे काय ? अशी शंका येते.

जगताना प्रत्येक घटनेशी, घटकेशी संघर्ष करणारी राणूची बायको भिवरा स्वभावाने खूप कडक आहे. पतीविषयी, बापाविषयी घर-मेंढवाडा याविषयी तिचे असणारे विचार सूक्ष्मतर पध्दतीने मांडलेले आहेत. मनाचे सूक्ष्मतर असे अनेक पैलू दाखविण्यात यश आले आहे हे खरे आहे.

भोवतालचा सर्व परिसर सोडून केवळ मनाभोवती रुंजी घालणं [illegible]. हे नागरकथेचे वैशिष्टय आहे.

जगण्यावर असीम प्रेम करणा-या लेखकाकडूनच मनोविश्लेषणातून नवे-नवे अर्थ साकार केले जातात. खूप वर्षे प्रपंच करूनही नवरा राणू सुधारत नाही म्हणून भिवरेला काय काय वाटले असेल ? विधवेपणी पोट घेऊन कसं वागायचं ? म्हणून स्वत:च चिंताक्रांत झालेल्या मोहितेबाई, कुमारिका असूनही आठ महिन्याची गरोदर कोंडी, नवी कोरी बायको की पोटासाठी अन्न या कोंडीत सापडलेला दत्तू, सारंच काही हरवलं अगदी स्वत्वही म्हणून वेडा झालेला शंकर पसारे या व्यक्तिरेखा चांगल्या वाटतात. पण त्यांची सारीच मांडणी नागर कथेला साजेशी झालेली आहे. ग्रामीणतेपासून खूप दूरवर या सर्व कथानकाची जडण घडण होते. सारी [illegible] कथानकाची जडण ग्रामीणतेची, अंतरात्मा मात्र नागर, ग्रामीण साहित्याची अशी द्विधा अवस्था सुस्पष्टपणे जाणवते. ग्रामीण साहित्यासंबंधाचे विचार डोळ्यांसमोर ठेवून जेव्हा पाहू लागतो तेव्हा काही लाल दिवे दिसू लागतात. ग्रामीणता आणि नागर यांची गल्लत झाली आहे; असे वाटू लागते.

अंतर्मनचित्रणावर विशेष भर -

माणसाची आकांक्षा फार मोठी आहे. अनेक गरजांची व्यवहारी जगामध्ये पूर्ती होत नाही. अपूर्ण आशा-आकांक्षाची मानसिक पातळीवर पूर्णता येऊ पाहते. सूप्त मन:प्रक्रियेतून त्याची पूर्णता होते. जसे वागणे असेल तशा स्वप्नाचे पाप-पुण्यदायी फल हे उदाहरण सूक्ष्ममनाचाच प्रत्यय देणारी बाब आहे.

बराचसा व्यवहारिक मोह आणि त्यातही पुन्हा वासनेचा अंश असल्याने गिरजाबाई मोहिते रामराव मर्तेच्या कृत्याला बळी पडतात. विधवा असूनही दिवस जातात आठ महिन्याच पोट वागवितांना पाप-पुण्यासह स्त्री दास्याचा विचार मनात घोळत राहतो... मी अशीच एका पुरुषाची कन्या, माझ्या पोटी अशाच एका पुरुषाची कन्या! ... कन्या का पुत्र ? पुत्र का कन्या ?... कन्या... पुत्र ... पुत्र... कन्या...कन्या... पुत्र ...! " (पृ. १४५)

– त्यांच्या पोटात गोळा गरगरून फिरला. भविष्यातला प्रत्येक क्षण अज्ञान आहे. या उत्सुकतेला मंगलमयता नाही, पाप म्हणूनच भकास-पणाची जाणीव होते.

मेनेक-याची 'दारका' छातीत कळा येऊन वारली. तिथे रडणा-–या 'मी'ला कोगल्याच्या मैनेनं घरी आणलं. त्या रात्री मला स्वप्न पडलं. 'ती जिवंत झाली आहे. पुन्हा लाडू शेव घ्यायला गर्दी झाली आहे. तिनं ते फुलाफुलाचंच लुगडं नेसलं आहे "(पृ. ११)

— द्वारकेचे सौंदर्य, गोरेपणा, नाजूक गुलगुळीत कन्या, चोपून साडी नेसण्याची पद्दत्ती हे सारे मोहविणारे आहे विशेष म्हणजे मला ही बायकू पाहिजे. म्हणून जास्त ध्यानात राहते. मनात असणारा सूक्ष्मतर विचार तसा प्रकट होतो.

दत्तूची कोरी बायको धोंडी - तिच्यावर संतूची वासनानजर आहे· दत्तू आई-लक्का आणि बायको-धोंडी याना संतूच्या शेतावर कामाला जायला नको म्हणून भांडण काढतो· शेजारी शंकरआण्णानं समेट घडविला· दत्तू घरात परत आला· " सगळं घर फिरायला लागलं· ···भिंतीवरच्या वाशांची अंधारात तडकी झाली· संतूच्या मळ्यातून आणलेलं जळाण तडकीच्या पुढं चालू लागलं··· अडदाणीची काठी नाचू लागली· ··· नव्या जमिनीत तीन हाताचा खड्डा पडला··· दत्तूचं मढं जाऊ लागलं· ··· पाठीमागं धोंडी आणि म्हातारी उभ्या होत्या··· संत्यानं धोंडीच्या आणि म्हातारीच्या देहाला धरून घरात नेलं··· (पृ· २०)

— कोंडलेल्या मनाचा दत्तू शेवटी संत्याच्या डोक्यात दगड घालण्यासाठी गटारीचा जंग दगड काढत होता· "पोट वाईट होतं आणि दत्तू रोजगारी होता·"(पृ· १८) हा त्याचा खरा 'कोंडमारा' आहे· दबलेल्या चिंबलेल्या मनाचा हा उद्रेक होणारच· सूक्ष्म स्वरूपातील ही चिंता केवळ दत्तूला जाळत राहते· त्याच्या मनचिंतनाचा प्रत्यय देण्यात लेखक सफल झाला आहे·

'ठिणगी' ही परशरामाची- लेथ कामगाराची- कर्मकहाणी आहे· विमलच्या लग्नासाठी पैसा, साधी, सुदा, गोंदा यांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी पैसा, प्रपंचासाठी पैसा- पैसाऽऽ आणायचा कोठून ?

" खाटेवरचं मांजर खोपड्यात जाऊन जळण्यातून एक उंदराचं पिट्कलं पकडून खारेवर आलं··· शेपूट, कान मागचे पाय त्याच्या तोंडात चिरचिरत हलत होते··· मांजरानं पिलाला अबदार चावलं··· सोडलं··· घाबरं घुबरं पिलू पळालं··· घटकाभर खेळ झाल्यावर मग त्याचा घास झाला··"(पृ·१६२)

— खूप मोठ्या प्रतीक योजनेतून त्याने आपले जीवन सांगितले आहे· कारखानदाराशी कामगाराचा खेळ म्हणजे मांजर-उंदराप्रमाणे आहे· उंदाराचा घास होणार हे नक्कीच आहे·

संसूचकपद्धतीने मांडणे, ताणचित्रण करणे. अंतर्विश्वा चा उलगडा करणे आदी वैशिष्ट्ये नागर साहित्याची आहेत. आनंद यादव म्हणतात, "ही आपला कथासंग्रह ग्रामीण आहे." मग येथे शेती, निसर्ग, कुटुंब, जात भावकी, गावकी, धर्म वगैरेचा संबंध कोठे आला आहे? ग्रामीण समाजाचा तेथल्या व्यक्तीच्या जीवनाशी एक कार्यकारणसंबंध असतो. त्याची विचार करण्याची पद्धती आणि संवेदना या बर .वर या सर्व घटकांचा एक विशिष्ट स्वरूपाने प्रभाव असतो. असा प्रभाव 'डवरणी' मध्ये नाही. स्वयंकेंद्रित आहे व शिवाय अंतर्मनचित्रणावर भर आहे. म्हणून या कथांचे खास ग्रामीण असे वैशिष्ट्य मनावर ठसत नाही.

कामुकतेचे चित्रण -

'डवरणी' मधील बहुतेक कथांमध्ये कामुकतेच्या हव्यास धागा चित्रणाला लेखकाने महत्त्व दिलेले दिसते. नुसते महत्त्व नाही तर लेखक स्वत:च त्यामध्ये रस घेत आहे असे वाचकांना वाटते. हे चित्रण निरागस कामप्रेरणेचे न वाटता विकृत कामविकाराचे वाटते. "माझी पहिली बायको" ही कथा कोणत्या अर्थाने ग्रामीण म्हणावयाची ? 'कवठी चाफा' वाचकांच्या मनातही संक्रमित होण्याइतका तेथे शृंगाराचे वर्णन आहे. या वर्णनालाही काही मर्यादा नाही. वर्ण्य वस्तू आणि वर्णन करणारा यांचे नाते संबंधतरी विचारात घ्यावे की नाही ? ते पथ्य सुद्धा पाळलेले नाही.

- 'मंगला' वरील बलात्काराचं चित्रण (गिधाडं)[५] "अर्धवट हवा भरलेल्या सायकलच्या इनरीमन हात, अंगाला वासाच्या साबणाचा वास घमघमतेला बागेवाडीच्या खळदाडात नेली, आरडाय लागली म्हणून तोंडात टोपी कोंबली... रसाचं आंब पिकल्यागत थानं पिकून काढली... चोळीची बटणं पातळ, हात-पाय कुणी धकडलं वगैरे "(पृ.५६) अशीच अवस्था 'कवठी चाफा' मध्ये शिवराम आणि मंजा यांच्या समागमाचे चित्रण येते. " आगीचे दोन

लोळ एकमेकावर लोळत होते. चार हातापायांची दुपडलेली वेणी ऋच्च होऊन पडली होती... (पृ१६) शेवटी कोंडीच्या डोक्यात विचार लाल-लाल होत गेलं आणि "दिनकरसमोर शड्डू मारून ताठ उभं राहावं. वाटलं (पृ.१६) या वर्णनाला त्यानी विशेष महत्त्व दिले आहे.

रामराव मतेंच्या विळख्यात जाताना झालेली मोहिते-बाईची अवस्था मोहविणारी आहे. सामान्य दर्जाच्या वाचकाला अशी शृंगार-प्रधान वर्णने हवी असतात. (सुळकेतील पाश )

खुळ्या शंकर पसारेची भूमिका काही याहून फारशी वेगळी नाही. बायकू पायजे ही त्याची मानसिक अवस्था आहे. (पृ४४) कोंडमा-यातील पारी, लक्षी, हौशी, या तर विषयासक्त संतूशी अनुसंधान साधून आहेत. (पृ.१७)

'माझी पहिली बायको' मधील 'आत्मा'च वय केवळ चार-साडेचार वर्षाचे आहे. 'पोर उघडच हिंडतय' (पृ. १) आईसमान असलेल्या तानीबाईने अंगावरील दूध पाजविताना पुष्ट स्तनाचे वर्णन करतो. " ते गोरंकमळ चक्राकार रुंद होत पसरलं ... दोन्ही स्तन पूर्णपणे उघडे झालेले. पदर पूर्णपणे बाजूला काढून टाकलेला. छातीच्या गोर प्रदेशावर एक एक स्तन तांब्यातांब्यात एवढा, लांबट तांबूस बोंडशी... इतके मोठे उघडे गोरे स्तन प्रथमच नव्या नवबाईनं पाहात होतो..." (पृ.३)

— जीवन स्त्रवणाऱ्या मातृदेवतेच्या स्तनांचे असे वर्णन करतात काय ? उलट मुलीच्या स्तनभाराचे वर्णन 'ठिणगी' मध्ये बापाकडून केले आहे. " ब्लाऊज तंग झालं होतं. चालताना अंग हिंदकळलं नि छाती जास्तच उभारल्यागत त्यात दिसली." (पृ. १५६)

— आता 'राणूची बायको' चार पोरांची आई पुन्हा दुसरा नवरा शोधायच्या भानगडीत पडली आहे. (पृ. १३८)

कित्येक कथांतून असे संदर्भ सापडतात. उथळवृत्तीच्या वाचकाला या कथा श्रेष्ठच वाटतात. ही वर्णनातील अतिरेकी भूमिका लेखकाला लोकप्रियता मिळवून देत असते.

वाचकांना आश्चर्य वाटावे म्हणूनच की काय मल्लू रामोशीला एकोणीस मुलांचे वरदान दिले आहे. घरी गोकुळ निर्माण केले आहे.(पृ. ६४)

कुमारिकेला दिवस गेल्याची बाब 'कोंडी' बाबतीत आहे. विधवेला दिवस गेलेत ते सुटकेतील पाश मधील 'मोहितेबाईना'. दोन्हीही कथा flash back 'विलोम' पद्धतीने मांडल्या आहेत.

'कोंडी' सातव्या महिन्यात आहे. पोट अवघडलेलं आहे. गळ्यात मंगलसूत्र किंवा डोरलं नाही." (पृ.३०) हे वाचकाच्या ध्यानी आल्यावर वाचक कथेमधून पुढे खेचला जातो.

"मोहितेबाई लोट घेऊन गाडीत चढल्या." (पृ.१४३) या वाक्यातूनही वाचकाची उत्सुकता वाढते. पातळाच्या फुगवट्यात आठव्या महिन्यात पोट लपेलच कसं ?

सौभाग्यवती सोनाला पूर्वाश्रमीचा प्रियकर जयवन्ता विचारतो, "पिक तर सभोर दिसतयचं. कितवा म्हयना ?" (पृ. २९) सोनाने प्रश्न अनुत्तरीत ठेवल्याने जयवन्ताच्या जिव्हारी धाव बसला. वाचकांची रुची वाढविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

चेतनगुणोक्तीचा उपयोग -
----------------

साहित्य एक कला आहे. शब्दसामर्थ्याने तिला सजीवता येते. वस्तू म्हणून वस्तूची दृश्य किंमत त्याला असते. पण साहित्यिकाचा त्याला

स्पर्श झाला की त्या वस्तूला सजीवता येते. पण या बाबीचा अतिरेक होऊ लागला की एकप्रकारचा निर्जीवपणा येतो. चेतनगुणोक्तीचा वर्णनात सोपेपणाने उपयोग करणे हे यादवांचे लेखनवैशिष्टय या कथांमध्येही जाणवते.

'हंडाही आ करून बघायला लागला.' (पृ.१३) कोंडलेल्या दत्तूच्या मनाची ही अवस्था सूचकतेने लेखकाला सांगावयाची आहे. अडदाणीची कणी नाचू लागली.(पृ.२०) - "लांब एक चिंचेचं झाड आपले केस मोकळे सोडून सकाळच्या उन्हाची आंघोळ करून उन्हातच केस वाळवत बसलेलं असतं." (पृ.८४) मनातला संशयाचा विचार बळावल्यानंतर ज्ञानदेव दार बंद करतो. बाहेर विश्व असं असतं: कपाटावर दोन जुने फोनोग्राफ पाय निखळल्यामुळे आणि आतली स्प्रिंगची आतडी काढून टाकल्यामुळे मरून पडले होते. (पृ. ९०)

अचेतन वस्तूवर सचेतनाचा आरोप करावयाचा, प्राणविहीन वस्तूवर मानवी मनाचे आरोप करावयाचे, सभोवतालच्या सृष्टीवर आपल्या दृष्टीचा अवलंब करावयाचा. ही पद्धती 'डवरणी' मध्ये जास्त प्रमाणात आहे.

शिव्यांचा अनाठायी वापर -

शिव्या आणि ओव्या ह्या अर्थघनच असतात. त्या भाषेची विशेष माहिती असल्याशिवाय ह्यातील हे अंतरंग समजत नाही. भाषेला कडकपणा यावा म्हणून शिव्यांचा वापर होत असावा काय ?

कवठी चाफा, हल्लक, राणूची बायको, हूल, माझी पहिली बायको, कोंडमारा, यामध्ये सुडक्या, लडदू हांडगूबा, भाड्या, सुक्काळीच्या रंडे, व्हैमाले, रांडं, वांझुटे, भडव्या, कडू, आडमुला, बेन्या, कुतरे, छिनाल रांड, भैनचोत, सोयरा, खज्जाळी, हरामखोर, लोदीकिडा, बाईलभाड्या अशा शिव्या सहजतेने उधळलेल्या आहेत. फोडणी घातल्याप्रमाणे शिव्या

सुध्दा कडक आहेत.

बदलत्या ग्रामीण जीवनाबद्दल आणि ग्रामीण साहित्याबद्दल आनंद यादव यांनी काही मते मांडली आहेत. ते म्हणतात, " प्रस्थापित ग्रामीण साहित्याची लोकप्रियता नेमकी कोणत्या साहित्य-विशेषात आहे, याचे हिशेब घालूनही पुष्कळवेळा १९६० ते १९८० मधील ग्रामीण कथा लिहिली जाताना दिसते. भडक नाटयपूर्ण घटना, बाई, बाटली, राजकारणाच्या भानगडी, चटपटीत आणि चटकदार संवाद, विनोदी किस्से ग्रामीण भाषेचे साहित्यनिर्मितीमधील माध्यम म्हणून असलेले प्रयोजन नीटपणे लक्षात न घेता तिचा प्रदर्शनसदृष्य उपयोग करणे व तिचे अनेक गावरान नखरे दाखविण्यातच धन्यता मानणे अशी काही लक्षणे १९६० ते १९८० मधील लोकप्रिय ग्रामीण साहित्याची म्हणून सांगता येतील."[१९]

चांगल्या ग्रामीण साहित्याला जे वर्ज्य म्हणून यादवांनी सांगितले आहे, त्यांचीच रेलचेल त्यांच्या 'ढवरणी' मधील कथांत जाणवावी हा दैवदुर्विलासच म्हणावा लागेल.

'ढवरणी'च्या मलपृष्ठावर "... ग्रामीण शृंगार आणि अनघड पौरुष, स्पंदनशील मनाची प्रतिमायुक्त चिंतने आणि चैतन्यपूर्ण लवचिक भाषा..." अशी त्यांची महती गायिली आहे. ही भाषासुध्दा वाचकांची दिशाभूल करणारी आहे, असे वाटते. या संग्रहातील या चार कथा तरी सामान्य अभिरुचीच्या वाचकाला भुरळच पाडतात. वासना-विचार, लैंगिक प्रेरणा ही माणसाची मूलभूत आणि प्रभावी प्रेरणा आहे. ही बाब ध्यानी ठेवून कथालेखन केले आहे.

"बदलत्या समाजजीवनाचे दर्शन आपल्या ढवरणी तून घडले आहे." असा निर्वाला त्यांनी 'खळाळ'च्या मुलाखतीमध्ये दिला आहे. पण लोकशाही यांत्रिकीकरण, आरोग्य केंद्रे, शिक्षणसंस्था यांचे जुजबी उल्लेख त्यांच्या कथांत येतात. प्रत्यक्ष बदलते समाजजीवन हा त्यांच्या कथांचा विषय होताना

दिसत नाही. तेव्हा यादवांचा याबाबतीतील दावा यथार्थ वाटत नाही.

सारांश -

आनंद यादवांच्या 'डवरणी' या कथासंग्रहातील कथामध्ये शेती या व्यवसायाचे आणि शेतकरी, शेतमजूर यांचे चित्रण 'खळाळ' मधील कथा-पेक्षाही कमीप्रमाणात येते. तसेच ग्रामीण जीवनाला व्यापून टाकणाऱ्या दारिद्र्याचे धर्मश्रध्दा, अंधश्रदा इ.चे चित्रण अल्पप्रमाणातच येते. ते त्यांच्या कथांचे विषय बनत नाहीत. त्यांच्या कथांतून कौटुंबिक जीवनातील ठरा-विक नातीच चित्रित होतात. उदा. त्यांच्या कथांतील स्त्री.पत्नी,प्रेयसी आई,एवढयाच नात्याने भेटते व पुरूष नवरा, प्रियकर,बाप एवढयाच नात्या-ने भेटतात. स्त्रीपुरूषाच्या नात्यामधील विविधता येथे प्रकट होत नाही. वर नमूद केलेले विषय हे त्यांच्या कथा आनुषंगिक स्वरूपाच्या उल्लेखातून निर्दिष्ट होतात. ते त्यांच्या कथांचे विषय बनत नाहीत.

'खळाळ'मधील कथा व्यक्तिमनाचे चित्रण करीत असताना दारिद्र्या-सारख्या सामाजिक कारणातून व्यक्तिमनावर पडणाऱ्या ताणाचे ते चित्रण अनेक कथांतून करतात. तर 'डवरणी' या कथासंग्रहातील कथांतील व्यक्तिमनाचे चित्रण करीत असता सामाजिक स्वरूपाची कारणे ते फारशी दाखवित नाहीत. 'शहाणा गाव,' 'हाताची गाडी' या सारख्या कथांचा अपवाद वगळला तर ते सामान्यत: ते व्यक्तीच्या स्वभाववैशिष्टयातून व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या अनैतिक वर्तनातून अथवा मानसिक विकृतीतून निर्माण होणाऱ्या ताणाचे ते चित्रण करतात. या कथांमधून कामुकतेला विषय म्हणून महत्त्व मिळताना दिसते व लेखकही कामकुतेचं चित्रण करताना रस घेत आहे, असे वाटते. या वैशिष्टयामुळे त्यांच्या कथांचे अस्सल ग्रामीणत्व कमी होते व लोकप्रिय नागर कथालेखकांच्या कथासारखी यादवां-ची कथा बनते, असे वाटते. चेतनगुणोक्तीचा वर्णन करताना अवलंब करणे हे यादवांच्या कथेचे वैशिष्टय या कथांमध्येही आढळते. चांगल्या ग्रामीण

साहित्याला जे वर्ज्य म्हणून ग्रामीण साहित्याचे समीक्षक या नात्याने यादवांनी सांगितले आहे. त्या वैशिष्टयाची विपुलता 'ढवरणी' या कथांमध्ये आढळते. यादवांच्या 'मातीखालची माती', 'खळाळ' व 'ढवरणी' या संग्रहाचा एकत्रित विचार करताना अस्सल ग्रामीणत्वाच्या चित्रणाचे प्रमाण त्यामध्ये उत्तरोत्तर घटले आहे व नागर कथांच्या आशयाची व अभिव्यक्तीची वैशिष्टये क्रमशः वाढली आहेत, असे म्हणावेसे वाटते.

संदर्भ


१· आनंद यादव, 'मराठी ग्रामीण कथा आणि लेखक: काही प्रश्न,' मुलाखत-प्रा·द·ता·भोसले, पृ·२०२·

२· शंकर पाटील, 'भेटीगाठी,' व्हला, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०, १९८२

३· शंकर पाटील, 'भेटीगाठी', सय, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०, १९८२·

४· व्यंकटेश माडगूळकर, 'गावाकडच्या गोष्टी', करणी, उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४, तिसरी आवृत्ती, १९८२·

५· शंकर पाटील, 'ऊन,' नांगरट, इंद्रायणी साहित्य, पुणे ३०, १९८०·

६· शंकर पाटील, 'वळीव,' नाटक, इंद्रायणी साहित्य, पुणे ३०, १९८०·

७· शंकर पाटील, 'वळीव,' आफत, इंद्रायणी साहित्य, पुणे, ३०· १९८०·

८· शंकर पाटील, 'वळीव', प्रतीक्षा, इंद्रायणी साहित्य, पुणे, ३०· १९८०·

९· संपा·आनंद यादव बाबा पाटील, 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा,' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८१·प्रस्तावना पृ· ९